# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

**संदर्भ** : साफुपुवि/निववि/९१८ **दिनांक** : १० मार्च, २०२५

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'ई—कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन' या उपक्रमाअतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत **ई—कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन**' साठी उपकरणे/सॉफ्टवेअर खरेदी उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२—२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत **'इ—कंटेन्ट डेव्हलपमेंट'** या उपक्रमांतर्गत साहित्य खरेदीसाठी विद्यापीठाने ज्या महाविद्यालयांना यापुर्वी मंजूरी दिलेली होती अशा महाविद्यालयांना ई—कंटेन्ट लॅबच्या अपग्रेडेशन साठी सोबत जोडलेल्या यादीतील उपकरणे/सॉफ्टवेअर खरेदीसाठी कमाल **रू. ५०,०००/—** (रू. पन्नास हजार फक्त) इतके अर्थसहाय्य **७५:२५** प्रमाणात देण्याचे निश्चित केले आहे.

सदर **'ई—कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन'** खरेदी उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत असून सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **सोमवार, दिनांक १०/०३/२०२५ ते मंगळवार दिनांक** २५/०३/२०२५ असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

आपणास विनंती की, सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून **शुक्रवार दिनांक** २८/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपली विश्वासू,

10/3/25

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव (अतिरिक्त कार्यभार)

सोबत: मार्गदर्शक तत्वे व इ—कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन उपकरणे यादी

9/8

**ई–कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन योजना :**

ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'इ–कंटेन्ट डेव्हलपमेंट' या उपक्रमांतर्गत साहित्य खरेदीसाठी विद्यापीठाने मंजूरी दिलेली होती. अशाच महाविद्यालयांना 'ई–कंटेन्ट लॅब अपग्रेडेशन' खालील यादीतील नमूद साहित्य/उपकरणे घेण्यासाठी साठी कमाल **रू. ५०,०००/– (रू. पन्नास हजार फक्त)** इतके अर्थसहाय्य ७५:२५ प्रमाणात मंजूर करण्यात येईल.

ज्या महाविद्यालयांनी यापुर्वी खालील यादीतील घेतलेले साहित्य गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत खरेदी केलेली त्यांनी पुन्हा तेच साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य मंजूर केले जाणार नाही.

**List of e-content Development Lab Upgradation Items under QIP**

| Sr. No. | Hardware |
|---|---|
| 1. | **Web Camera 4k Resolution** |
| 2. | **Camera Stand-**<br>1.**VERSATILE COMPATIBILITY-** Compatible with digital cameras, video cameras, DSLRs, projectors, and smartphones, offering adaptability for diverse shooting needs.<br>2. **ECURE LOAD CAPACITY:** Supports a maximum load of 5kg, ensuring your equipment stays safe and steady during use. |
| 3. | **Branded USB Microphone for Podcasting, Recording, Streaming & Gaming. Built-in Headphone Output, All Metal housing and Cardioid Condenser Capsule**<br>1. Hardware Platform- Laptop, PC, Smartphone<br>2. Frequency Range- 20-20000 hertz<br>3. Signal-to-Noise Ratio -60 dB<br>4. Microphone Form Factor- Tri-Capsule Array |
| 4. | **Wireless Microphone – collar mic** |
| 5. | **USB Video Capture Card Cable**<br>GEN 3 60 FPS, 4K, HDMI to USB 3.0 MJPEG YUV Game Capture Device Aluminium Windows Android Mac,HD 1080P 60fps Video Live Streaming Gaming, Teaching |
| 6. | **Audio Mixer**<br>Minimum 4 Channels |
| 7. | **Green Chroma Screen with Frame** |
| 8. | **Minimum 16" Teleprompter**<br>Compatibility Smartphone & DSLR Supports w/Remote Control, APP Compatible with iOS & Android System for Video Creator |
| 9. | **3 Point LED Video Lights with Softbox** |
| | **Software** |
| 1. | **Camtasia**<br>Perpetual license for education - **user** |
| 2. | **OBS - Free** |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे–७

२/४

**या योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी सामाईक नियमावली व कार्यनिर्देश मार्गदर्शिका :**

१) विद्यापीठाने अर्थसहाय्य मंजूर यादी जाहीर केलेल्या दिनांकानंतर महाविद्यालये/परिसंस्थेने उपकरणे खरेदीची प्रक्रिया राबवावी.

२) फक्त नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुर्नमूल्यांकन केलेली अथवा पुर्नमूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था आणि नॅक अथवा एन.बी.ए. पुर्नमूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याची चलनाची साक्षांकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

३) महाविद्यालये/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता असलेल्या महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल. सदर मान्यतेची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे शुल्क अदा केले आहे अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

५) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नाही किंवा सुरु नाही. अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

६) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले आहे. अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

७) विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नीत झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय/परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

८) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

९) गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

१०) उपकरणे खरेदी साहित्यामध्ये फक्त भांडवली खर्चाअंतर्गत येणाऱ्या साहित्यांचा समावेश असावा. अर्थसहाय्य मंजूरी कमाल रू. ५०,०००/— (पन्नास हजार फक्त) एकूण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार (७५ टक्के विद्यापीठ हिस्सा, २५ टक्के महाविद्यालये/परिसंस्थेचा हिस्सा) अदा करण्यात येईल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे-७

११) शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'इ–कंटेन्ट डेव्हलपमेंट' या उपक्रमांतर्गत साहित्य खरेदीसाठी विद्यापीठाने मंजूरी दिलेली होती त्या पत्राची/पानाची प्रत सोबत जोडावी.

१२) ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थाना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थानी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

१३) नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना–हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा तसेच चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नीकरणाचे (नूतनीकरण) शुल्क भरलेल्या चलनाची छायांकित प्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१४) महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे/संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१५) संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील कायमस्वरुपी मान्यताप्राप्त/प्रभारी प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१६) सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे.

१७) इ–कन्टेंट उपकरणे खरेदी करण्यासाठी तीन पुरवठादारांची/ कंपन्याची दरपत्रके जर ई–मेल वरुन मागविली असतील तर सदर दरपत्रके ज्या ई–मेल वरुन आले त्या ई–मेलच्या पहिल्या पानाची प्रत व दरपत्रक प्राचार्य/संचालकाच्या सही शिक्क्यासह प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१८) गुणवत्ता सुधार योजनेसाठीचे अनुदानाबाबतचे निर्णय हे संबधित अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून घेतले जातील.

१९) कोणताही प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

२०) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहीत मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, मार्गदर्शक तत्वांनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे –

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे–७